राज्यात आदिवासी क्षेत्रात अति तीव्र कुपोषित बालकांसाठी ( SAM) ग्राम बाल विकास केंद्र (व्ही.सी.डी.सी.) योजना सुरु करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास वि भाग**
**शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१६/प्र.क्र. ४३ भाग १ ब /का-५**
**नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक:- ११ ऑगस्ट, २०१७**

वाचा :-१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय एबावि-२००९/प्र.क्र.१८१/का-५ दि. १७/०९/२०१०

२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि २०१६/प्र.क्र.४३/(भाग-१ ब) /का-५ दि. २५/१०/२०१६

प्रस्तावना :-

राज्यात आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडयांमध्ये ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) स्थापन करण्याची योजना सुरु करण्याबाबत दि. २५/१०/२०१६ रोजी महिला व बाल विकास विभाग तसेच आदिवासी विकास विभाग यांच्या संयुक्त मान्यतेने शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तथापि, आता यापूर्वीचे ग्राम बाल विकास केंद्रां- संदर्भातील सर्व शासन निर्णय अधिक्रमित करून सुधारित शासन निर्णय निर्गमित करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी शासनाने गेल्या काही वर्षात विविध उपाययोजना केल्या आहेत. कुपोषणावर मात करण्यासाठी पूरक पोषण आहार देणे आणि वेळीच आवश्यक आरोग्य सेवा पुरविणे या दोन्ही महत्वाच्या बाबी आहेत. किंबहुना पूरक पोषण आणि आरोग्य सेवा या दोन्ही एकत्रितपणे आणि समन्वयाने पुरविल्या तरच हा प्रश्न सोडविता येईल. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अशी एक उपाययोजना एकत्रितरित्या अंगणवाडी केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उप केंद्र, उप जिल्हा रुग्णालय, जिल्हा आरोग्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय, व वैद्यकीय महाविद्यालय या विविध पातळीवर करण्याची आवश्यकता आहे. अशी एक योजना यापूर्वी केंद्र शासनाच्या निधीतून राज्यात ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना, आरोग्य विभागाकडून सुरु होती. यासाठी केंद्राकडून मिळणारा निधी बंद झाल्याने सदरची योजना राज्यात बंद करण्यात आली होती. सद्य:स्थितीत अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) स्थापन करुन अति तीव्र कुपोषित सॅम (SAM) बालकांवर उपचार करण्याची योजना राबविणे राज्य शासनाला आवश्यक वाटते. महत्वाचे म्हणजे आदिवासी क्षेत्रातील SAM बालकांचे कुपोषणावर प्रभावीपणे ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) मार्फत उपाययोजना करणे गरजेचे आहे. याचे कारण असे की, आदिवासी क्षेत्रातील SAM बालके Highest Risk श्रेणीमध्ये असतात. आदिवासी क्षेत्रातील लहान बालकांच्या कुपोषणावर प्रभावीपणे मात करण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना सुरु करुन अंमलबजावणी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राज्यातील आदिवासी क्षेत्रात ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना राबविण्यासाठी या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) ही योजना सदरचे आर्थीक वर्ष (सन २०१७-१८) गृहित धरुन पुढील ३ आर्थिक वर्षांकरिता सुरु राहील. तद्नंतर या योजनेच्या फलनिष्पत्ती व त्रयस्थ संस्थेच्या ( ३rd Party Evaluation )मूल्यमापनाच्या आधारावर पुढील निर्णय घेण्यात येईल. सदर योजनेचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

३. योजनेचे स्वरुप व अंमलबजावणी

महाराष्ट्र शासनाची ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना Community Management of SAM Children Defined Protocol यांचे धोरणावर आधारित आहे. अंगणवाडी स्तरावर दर महिन्याला ठराविक दिवशी ( ICDS निर्धारित ) अंगणवाडी मधील सर्व बालकांचे वजन आणि उंची अंगणवाडी कार्यकर्ती मार्फत घेण्यात यावे. त्यानुसार बालकांचे सॅम (SAM) / मॅम (MAM) / सर्वसाधारण असे वर्गीकरण करण्यात यावे. वैद्यकिय अधिकारी/ आरोग्य सहाय्यक/ सहाय्यिका / एएनएम मार्फत सॅम (SAM)व मॅम (MAM) बालकांची तपासणी करून सॅम (SAM) /मॅम (MAM) व सर्वसाधारण यांची खात्री केली जाईल. सॅम (SAM) व मॅम (MAM) या बालकांची यादी अंगणवाडी कार्यकर्ती दरमहा अद्ययावत करेल एएनएम/ आरोग्य सहाय्यक / सहाय्यिका / वैद्यकिय अधिकारी हे आरोग्य सेवा सत्राच्या दिवशी सॅम (SAM)व मॅम (MAM) वर्गीकरण करतील यांचे पैकी जी SAM बालकं काही रोगाने ग्रासीत असतील त्यांना पुढील उपचाराकरिता बाल उपचार केंद्र (CTC) / पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) मध्ये संदर्भित करण्यात यावे. आरोग्य विभागाने तपासणी करून खात्री केलेल्या **सर्व आजारी नसलेल्या SAM कुपोषित बालके (Non Medical SAM Cases) यांना व्ही.सी. डी. सी. मध्ये प्रवेश दिला जाईल.** यामध्ये सहा महिन्यापासून सहा वर्षापर्यंतच्या बालकांचा समावेश राहिल. सहा महिने ते तीन वर्षाचे बालक सरासरी अंगणवाडीत येत नसून त्यांना पालक/काळजीवाहक घेऊन येतील. तीन ते सहा वर्ष वयोगटातील बालकांची अंगणवाडी सेविका व मदतनिस यांचेकडून उपचार/देखभाल केली जाईल. ग्राम बाल विकास केंद्रा( VCDC) मध्ये केवळ SAM बालकांचा समावेश राहिल. **ग्राम बाल विकास केंद्रा( VCDC) मध्ये MAM बालकांचा समावेश करता येणार नाही.**

**अति तीव्र कुपोषित बालक (SAM):-**

**३.१** ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजनेचे संनियंत्रण अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे राहतील. ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) करिता वापरण्यात येणाऱ्या Software Application मधे माहिती शासनास तत्परतेने सादर करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

**३.२** महिला व बाल विकास अधिकारी ( जिल्हा परिषद )/ जिल्हा आरोग्य अधिकारी सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता समन्वय ठेवतील आणि सह संनियंत्रण अधिकारी म्हणून काम करतील. ज्या क्षेत्रामध्ये SAM बालकं आढळतील तिथे महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अंगणवाडी केंद्रास ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) म्हणून घोषित करतील.

**३.३** असे ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) म्हणून घोषित केलेल्या अंगणवाडीमधील अंगणवाडी सेविका ६ महिन्यापासून ६ वर्षांपर्यंतच्या बालकांची उंची आणि वजन घेऊन SAM बालकांची नोंद वहीत नोंद ठेवतील त्यानंतर एएनएम / सहाय्यिका / आरोग्य सहाय्यक / प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी (PHC Doctor) हे बालक SAM श्रेणीतील (category) आहे किंवा नाही याबाबत तपासणी करून खात्री करतील आणि ग्राम बाल विकास केंद्रात (VCDC) दाखल करण्याची गरज असल्यास SAM बालकाला ग्राम बाल विकास केंद्रात (VCDC) दाखल करण्यात येईल.

**३.३(ए)** एएनएम / आरोग्य सहाय्यक सहाय्यिक /प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी (PHC Doctor) यांना सॅम (SAM) बालकांची तपासणी करून खात्री करणे बंधनकारक राहिल. आजारी असलेल्या सॅम (SAM) बालकांना वैद्यकीय उपचारासाठी सीटीसी/एनआरसी मध्ये संदर्भ सेवा देण्यात येईल आणि आजारी नसलेल्या सॅम (SAM) बालकांना तपासणी नंतर खात्री केल्यानंतर ग्राम बाल विकास केंद्रा (VCDC) मध्ये भरती केले जाईल.

**३.३ (बी**) वैद्यकीय तपासणी नंतर खात्री केलेल्या बालकांना प्रमाणपत्रानंतर भरती करण्यात आलेल्या सर्व बालकांना ग्राम बाल विकास केंद्रात (VCDC) प्रोटाकॉल प्रमाणे ॲन्टीबायोटीक्स, जंत नाशक औषधे, अ जीवनसत्व व आवश्यकतेनुसार उपचार देण्यात येईल. सदर औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत उपलब्ध साठयानुसार वितरीत करण्यात येतील. ही औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

**३.३. (सी)** सर्व सॅम (SAM) बालकांना नियमित अंगणवाडी आहार कायम ठेवण्यात येईल. याशिवाय अतिरिक्त आहाराच्या स्वरुपात SAM बालकांना **Energy Dense Nutritious Foods (EDNF )** देण्यात येईल. प्रत्येक बालकाला मार्गदर्शक सूचनानुसार ( निश्चित केलेल्या प्रोटोकॉलनुसार ) आरोग्य विभागाचे अधिकारी / कर्मचारी मात्रा(डोस) निर्धारित करतील. प्रतिदिवस किमान १ ते जास्तीत जास्त ३ पाकिटं/सॅचेट पर्यंत डोसेस असतील. तरीही विशेष प्रकरणी वैद्यकीय सल्लयानुसार ही डोसेज ( मात्रा ) ३ सॅचेट पेक्षा अधिक किंवा कमी करता येईल.

**३.४** आठवडयातून एकदा ए.एन.एम., १५ दिवसातुन एकदा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी हे ग्राम बाल विकास केंद्राला (VCDC) भेट देतील व सर्व बालकांची तपासणी /चाचणी करतील. ज्या बालकांच्या वजनात वाढ/ सुधारणा दिसणार नाही त्यांना ग्राम

बाल विकास केंद्रा (VCDC) मध्ये पुढील कालावधीसाठी ठेवण्याबाबत अथवा पुढील वैद्यकीय उपचारार्थ बाल उपचार केंद्र) CTC( पोषण पुनर्वसन केंद्र) NRC( मध्ये मध्ये दाखल करण्याबाबत निर्णय वैद्यकीय अधिकारी घेतील.

**३.५** अंगणवाडी सेविका बालकांची दर आठवडयातून दोनदा वजन घेऊन, बालकांच्या वजनात सुधारणा होते आहे किंवा कसे याची नोंद ग्राम बाल विकास केंद्रा (VCDC) रजिस्टर मध्ये करतील. तसेच त्यानुसार एएनएम / आरोग्य सहाय्यक / आरोग्य सहाय्यिका / वैद्यकीय अधिकारी यांच्या मदतीने अंगणवाडी सेविका बालकांची साधारण(Normal), मध्यम तीव्र कुपोषित ( MAM ) आणि अति तीव्र कुपोषित (SAM) अशी वर्गवारी करतील.

**३.६** बालकास ग्राम बाल विकास केंद्रात (VCDC) दाखल केल्यानंतर अंगणवाडीच्या कामकाजाच्या वेळेत उपचार केले जातील व त्यानंतर होम बेस व्हि.सी.डी.सी.मार्फत उपचार करण्यात येतील. अंगणवाडी सेविका/ अंगणवाडी मदतनिस /एएनएम / आरोग्य सहाय्यक / आरोग्य सहाय्यिका यांच्या गृहभेटींवर सुध्दा लक्ष केंद्रीत करणे आवश्यक राहिल. अंगणवाडीच्या वेळेत अंगणवाडीत असलेल्या बालकाला अंगणवाडी सेविका सकस आहार व **Energy Dense Nutritious Foods (EDNF )** खाऊ घालतील. सॅम बालकांना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या नियमित पोषण आहाराव्यतिरिक्त दिवसातून किमान ३ वेळा Energy Dense Nutritious Foods (EDNF) देण्यात येईल. उरलेले पाकिट बालकाला घरी खावू घालण्याकरिता पालकाकडे दिले जाईल. कोणत्याही परिस्थितीत बालकांच्या हाती Energy Dense Nutritious Foods (EDNF) देण्यात येणार नाही. तसेच दुसऱ्या दिवशी हे रिकामे झालेले पाकिट अंगणवाडीत संबंधित पालकांकडून जमा केले जाईल. बालकांनी आहाराचे सेवन केल्याची खात्री अंगणवाडी सेविकेने करावी. Energy Dense Nutritious Foods (EDNF) चे पाकिट एक बालक एकाच वेळी खाऊन संपवेल याची काळजी / शक्यतो प्रयत्न अंगणवाडी सेविकेने करावयाचा आहे. Energy Dense Nutritious Foods (EDNF) चे पाकिट hermetically sealed असावे.

**३.७** सॅम SAM बालकांना ग्राम बाल विकास केंद्रा (VCDC) मध्ये सर्वसाधारणपणे चार आठवडयापर्यंत व वैद्यकिय शिफारसीनुसार जास्तीत जास्त बारा आठवडयापर्यंत ठेवण्यात येईल. तसेच त्यांची Energy Dense Nutritious Foods (EDNF) ची मात्रासुध्दा मार्गदर्शक सूचनांनूसार ( निश्चित केलेल्या प्रोटोकॉल नुसार) वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार दिली जाईल. गरजेनुसार वैद्यकीय सल्लयाने सदर Energy Dense Nutritious Foods (EDNF) ची मात्रा कमी/ जास्त करता येईल. SAM बालकाने टारगेट वजन ( <-२ SD ) गाठल्यानंतर विहीत VCDC प्रोटोकॉलनुसार वैद्यकीय अधिकाऱ्यांनी खात्री केल्यानंतर संबंधित बालकास डिस्चार्ज देण्यात येईल.

**३.८** SAM बालकांना प्रति दिन प्रति बालक कमाल मर्यादा रु ७५/- आहारखर्चासाठी ठेवण्यात आले आहेत यामधे कुपोषित बालकांसाठी आय.सी.डी.एस. अंतर्गत असलेलया अतिरिक्त आहारासाठीची तरतूद समायोजित करण्यात येईल ( रू. २ प्रती दिन प्रती लाभार्थी ).

ज्या त्या जिल्हयातील SAM बालकांची संख्या विचारात घेवून प्रति दिन प्रति बालक रु. ७५/- खर्च गृहीत धरुन वित्त विभागाच्या वित्तीय अधिकार नियमावलीतील तरतूदीनुसार EDNF खरेदीसाठीची निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही आयुक्त, एकात्मित बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेस्तरावर करण्यात येईल.

**३.९** अंगणवाडीत एकात्मिक बाल विकास सेवा योजने (आय.सी.डी.एस.) अंतर्गत मिळणाऱ्या सकस आहारा व्यतिरिक्त सॅम (SAM) बालकांना Energy Dense Nutritious Foods (EDNF) दिला जाईल. त्यांचे composition UNICEF आणि WHO यांच्या standard protocol प्रमाणे राहील. Energy Dense Nutritious Foods (EDNF) यामध्ये साधारणत: ५२० ते ५५५ कि.कॅलरिज प्रति १०० ग्रॅम व आवश्यक मायक्रोन्यट्रीयन्टचा समावेश राहणार आहे. प्रत्येक सॅम बालकांस प्रति दिन ९२ ग्रॅमचे Energy Dense Nutritious Food चे पॅकेट/ साचेट देण्यात येईल.( SAM बालकांकरिता जास्तीत जास्त ३ व कमीत कमी १ पाकिटे उपलब्ध करुन देण्यात येतील, सदर पाकिटांची संख्या निश्चित केलेल्या प्रोटोकॉलनूसार सॅम बालकांचे वय, वजन व उंची विचारात घेऊन वैद्यकीय सल्लयाने निश्चित करण्यात येईल.)

**WHO, UNICEF तसेच WFP यांनी शिफारस केलेला Energy Dense Nutritious Food (EDNF) मधील घटक/ micro nutrient त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| Vitamin A | 0.80 to 1.1 mg |
| Vitamin D | 15.00 to 20.00 mcg |
| Vitamin E | 20.00 mg |
| Vitamin C | 50.00 mg |
| Niacin | 5.76 mg |
| Pantothenic Acid | 3.04 mg |
| Vitamin B2 | 1.60 mg |
| Vitamin B6 | 0.6 mg |
| Vitamin B1 | 0.50 mg |
| Folic Acid | 200.0 mcg |
| Biotin | 60.00 mcg |
| Vitamin K | 15 to 30 mcg |
| Vitamin B12 | 1.63 mcg |
| Potassium | 1100 - 1400 mg |
| Calcium | 300 - 600 mg |
| Phosphorus | 300 - 600 mg |
| Sodium | <290 mg |
| Magnesium | 80 to 140 mg |
| Zinc | 11.00 to 14.00 mg |
| Iron | 10.00 to 14 mg |
| Copper | 1.4 to 1.8 mg |

| | |
|---|---|
| Iodine | 70 to 140 mcg |
| Selenium | 20 to 40 mcg |
| n-6 Fatty Acids | 3% to 10% Of Total Energy |
| n-3 Fatty Acids | 0.3% to 2.5% Of Total Energy |
| Peanut | 30% |
| Sugar | 29 % |
| Milk Solid | 20% |
| Vegetable Oils | 18% |
| Emulsifier ( E471), Minerals, Vitamins, Antioxidant ( E304,E306, E472c) | As per WHO SPECS |

| **TEST** | **TECHNICAL SPECIFICATIONS** | |
|---|---|---|
| Description | Yellow, light brown to brown coloured paste | |
| Flavour and Odour | Pleasing sweet, clean dairy flavour and odour | |
| Net Wt. | 92 g Sachet (90.16 g to 93.84 g) | |
| Loss on Drying (105$^0$C for 3 Hrs) | Not more than 2.5 % | |
| Texture | Smooth homogeneous texture, free from lumps | |
| Foreign Material | Should be free from any foreign matter/impurities. | |
| Ash Content | 3.0 to 4.0 % | |
| Description | Yellow, light brown to brown coloured paste | |
| Moisture Content | 2.5% maximum . | |
| Net Wt. | 92 g Sachet (90.16 g to 93.84 g) | |
| **Parameter** | **Label claim per 100g of product** | |
| Energy | 520 to 550 | Kcal |
| Protein | 10% to 12 % | g of Total Energy |
| Lipids | 45% to 60% | g of Total Energy |
| Total Carbohydrates | 45.0 | G |

३.१० SAM बालकांना जास्तीत जास्त १२ आठवडयासाठी ग्राम बाल विकास केंद्रात (VCDC)भरती केली जाईल. त्यानंतर ग्राम बाल विकास केंद्रा (VCDC) मधून बालकास डीस्चार्ज दिल्यानंतर पुढील सहा महिन्यांपर्यत दर आठवडयाला अंगणवाडी सेविका अंगणवाडीमध्ये बालकांचे वजन घेतील व बालकाच्या प्रकृतीवर आरोग्य व एकात्मिक बाल विकास सेवा योजने (आय.सी.डी.एस.) यंत्रणेमार्फत लक्ष दिले जाईल.

३.१०(ए) जिल्हा परिषद अंतर्गत आय.सी.डी.एस. आणि आरोग्य खात्याचे सर्व अधिकारी कर्मचारी कालबध्द आणि सुनियोजित पध्दतीने सॅम (SAM) बालकांच्या पालकांचे समुपदेश करुन बालकांची काळजी घेणे, पोषण आहार, आरोग्य व आहार विषयक चुकीच्या सवयींमध्ये सुधारणा / बदल करण्याबाबत अवगत करतील जेणेकरुन व्ही.सी.डी.सी.तून डीस्चार्ज झाल्यानंतर बालक पुन्हा कुपोषणाच्या वर्गवारीत येणार नाही. याच्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली एक संपूर्ण ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) कृति आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी केली जाईल.

**<u>प्रशासकीय धोरण :-</u>**

**४.** आदिवासी क्षेत्रातील व्ही.सी.डी.सी. योजना १६ जिल्हयात राबविण्यात येईल. त्या सर्व जिल्हयातील जिल्हा परिषद/उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांना योजनेची माहिती संकलित करण्यासाठी प्रतिवर्षी रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) प्रदान केले जातील.

४.२ दर वर्षी रु ५००/- (रुपये पाचशे फक्त) प्रति अंगणवाडी तरतूद ठेवण्यात येईल. यामधून रजिस्टर व उंची मापक तक्ता ( Height Chart) खरेदी करण्यात येईल. सदर रक्कम बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावर ठेवण्यात येईल.

४.३ आकस्मिक खर्चाकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे स्तरावर प्रतीवर्ष रू. १,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त ) इतकी तरतूद ठेवण्यात येईल.

४.४ ग्राम बाल विकास केंद्रा (VCDC) अंतर्गत बालकांची संख्या अत्यल्प असल्याने एका गावात अनेक अंगणवाडी केंद्र असल्यास त्या गावातील एकाच अंगणवाडी केंद्राला ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) अंगणवाडी घोषित करण्यात येईल व ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) अंगणवाडी प्रस्तावित करण्याची जबाबदारी संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहिल. या प्रस्तावास मान्यता देवून ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) अंगणवाडी म्हणून घोषित करण्याची जबाबदारी महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

४.५ ज्या अंगणवाडी ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) स्थापन करण्यात आलेले आहे, अशा अंगणवाडी केंद्राच्या सेविका व मदतनीस यांना प्रत्येकी प्रती दिन प्रती लाभार्थी रू.५/- प्रमाणे मोबदला देण्यात येईल.

४.६ ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) करिता वापरण्यात येणाऱ्या Software Application मधे माहिती भरण्याची ( Data Entry ) जबाबदारी संबंधित पर्यवेक्षिकांची राहील.

वरील प्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरविण्यात येणारी सेवा आणि सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नियमित चाचणी, औषधी उपलब्धता यांची सांगड घालून ग्राम बाल विकास केंद्रामार्फत (VCDC) या योजनेची अंमलबजावणी केली जाईल. यासंबंधीची जबाबदारी संबंधित तालुक्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांची संयुक्तपणे राहील.

**५.** वैद्यकिय अधिकारी/ आरोग्य सहाय्यक / सहाय्यिका /ए.एन.एम. हे सॅम(SAM) बालकांची यादी प्रमाणित करतील व अशा बालकांना ग्राम बाल विकास केंद्रा (VCDC) मध्ये दाखल करण्यात येईल.

**६.** आदिवासी क्षेत्रासाठी ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना लागू करण्यासाठी प्रति दिन प्रति बालक खर्चाचा तपशील व वित्तीय निकष पुढील प्रमाणे आहेत.

**अ) VCDC अंतर्गत SAM बालकांकरिता प्रती बालक प्रती दिन खर्चाचा तपशील व वित्तीय निकष पुढीलप्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | बाब | प्रति बालक खर्च |
|---|---|---|
| १ | बालकाच्या पोषणासाठी (Energy Dense Nutritious Food दिवसातून जास्तीत जास्त ३ साचेट एकुण वजन ९२ ग्रॅम प्रमाणे (रु. २५ X ३ साचेट ) | रू. ७५/-<br>( कमाल मर्यादा) |
| २ | SAM बालकांची संख्या ( डिसेंबर २०१६ एमपीआर नुसार ) | २८८३७ |
| | **प्रति दिन सॅम बालकांवरील एकूण खर्च** | रु. २१,६२,७७५ /- |
| ३ | एका बालकाला प्रतिदिन रु.७५/- या प्रमाणे ७२ दिवस (कमाल मर्यादा ) (Energy Dense Nutritious Food) देण्यासाठी रु.५४००/- इतका खर्च येतो, सॅम बालकांची संख्या एकूण २८८३७ x रु.५४०० प्रमाणे वार्षिक खर्च | रु.१५,५७,१९,८००/- |
| ४ | अंगणवाडी सेविका व मदतनीस मोबदला (प्रत्येकी प्रती बालक प्रती दिन रू. ५ प्रमाणे ) असे एकूण १० x ७२ दिवस (कमाल मर्यादा ) x २८८३७ | रू. २,०७,६२,६४०/- |
| | **एकूण खर्च ( आहार + मानधन )** | **१७,६४,८२,४४०/-** |

**I) प्रशासकीय खर्च ( जिल्हास्तर)**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय खर्च प्रतिजिल्हा | रु ५००००/- |
| २ | जिल्हयांची संख्या | १६ |
| | एकूण | **रु ८,००,०००/-** |

**II) प्रशासकीय खर्च ( अंगणवाडी स्तर)**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रति अंगणवाडी खर्च प्रति वर्षी ( रजिस्टर व उंची मापक तक्ता करिता ) | रु ५००/- |
| २ | अंगणवाडयांची संख्या (कमाल ) | १८२११ ( अंगणवाडया - १६०१७ व मिनी अंगणवाडया २१९४ ) |
| | एकूण | **रु ९१,०५,५००/-** |

**III) आकस्मिक खर्च**

| | | |
|---|---|---|
| १ | आकस्मिक खर्च प्रती वर्ष करिता ( प्रति जिल्हा) (आकस्मिक खर्चात आकस्मिक उदभवणाऱ्या अपवादात्मक खर्चांकरिता/औषधांकरिता सदर तरतूद असेल.) | रु १०००००/- |
| २ | आदिवासी जिल्हयांची संख्या | १६ |
| | एकूण | **रु १६,००,०००/-** |

सदर आकस्मिक निधीवर संपूर्ण संनियंत्रणाची जबाबदारी संबंधित जिल्हयातील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहिल. आकस्मिक खर्चासाठी निश्चित केलेल्या निधी मधून कमतरता असल्यास जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या तांत्रिक सल्लयाने आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मान्यतेनुसार औषंधांची खरेदी करण्यात यावी व ही औषधे इडिएल नुसार तसेच ग्राम बाल विकास केंद्रा (VCDC) मध्ये दाखल होणाऱ्या सॅम (SAM) बालकांच्या संख्येनुसार Energy Dense Nutritious Foods (EDNF) ची खरेदी करण्यात यावी. सदर बाबीखालील अखर्चित रक्कमा सन २०१९-२० या वित्तीय वर्ष अखेरिस शासनास प्रत्यार्पित करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहिल.

सॅम (SAM) बालकांना Energy Dense Nutritious Foods (EDNF) देण्यासाठी पुरवठयाचे दर निश्चित होणेसाठी निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर जे न्युनतम दर मंजुर होतील त्याप्रमाणात आहारावर वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे निधी खर्च करण्यात येईल.

सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेला वार्षिक खर्च एकूण रू. १८,७९,८७,९४०/- ( रुपये अठरा कोटी एकोणएंशी लक्ष सत्त्यांशी हजार नऊशे चाळीस फक्त) इतका निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

सदर योजनेसाठी आवश्यक खर्च सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मागणी क्र. टी-०५, लेखाशीर्ष २२३६, पोषण आहार ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, (०१)(०८) ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) (२२३६१७९४), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) संकेतांक (८०००७३४२) या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा.

सदरचा शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १८८/ व्यय १४, दि. १७.१०.२०१६ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र २०१७०८१९१२४२२७८९३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing
Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2017.08.19 12:33:02 +05'30'

**( ला. रा. गुजर )**
शासनाचे उप सचिव

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
४) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) मा. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६) सर्व मंत्रालयीन विभाग
१७) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
१८) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९) सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग
२०) सदस्य सचिव, राज्य महिला आयोग
२१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)(लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
२२) सर्व विभागीय आयुक्त
२३) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
२४) सर्व जिल्हाधिकारी
२५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२६) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
२७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२९) वित्त विभाग/व्यय-६, मंत्रालय, मुंबई
३०) नियोजन विभाग/का.१४७२, मंत्रालय, मुंबई
३१) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
३२) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण), जिल्हा परिषद
३३) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)
३४) सर्व एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण / आदिवासी)
३५) महिला व बाल विकास विभागातील सर्व अधिकारी/कार्यासने
३६) निवड नस्ती (कार्यासन ५)